**<u>खाजगी अनुदानित शाळांतील अतिरिक्त शिक्षकांचे स्थानिक स्वराज्य संस्थेच्या (जिप/नपा/नप/मनपा) शाळांमध्ये तसेच स्थानिक स्वराज्य संस्थेच्या शाळेतील अतिरिक्त शिक्षकांचे खाजगी अनुदानित शाळांमध्ये समायोजन करण्याची कार्यपध्दती.</u>**

**महाराष्ट्र शासन**
**शालेय शिक्षण व क्रीडा विभाग**
**शासन निर्णय क्रमांक : एसएसएन-२०१७/(२२/१७)/टीएनटी-२**
मंत्रालय, विस्तार भवन, मुंबई ४०० ०३२
दिनांक : ०४ ऑक्टोबर, २०१७

<u>वाचा :</u> १) शासन परिपत्रक क्रमांक व्हिएलएस-१४१२/(३६९/१२)/प्राशि-३ दि.०४ डिसेंबर,२०१२
२) शासन परिपत्रक क्रमांक एसएसएन-२०१४/प्र.क्र.५/१४/टीएनटी-२ दि.२८ नोव्हेंबर, २०१४

**<u>प्रस्तावना :-</u>**

राज्यातील अनुदानित खाजगी प्राथमिक शाळेतील अतिरिक्त ठरलेल्या शिक्षकांचे समायोजन करण्याबाबतची कार्यपध्दती संदर्भाधीन दिनांक ४ डिसेंबर, २०१२ व दिनांक २८ नोव्हेंबर, २०१४ च्या परिपत्रकान्वये निश्चित करण्यात आली आहे.

२. तथापि, अतिरिक्त शिक्षकांना समायोजित करण्याबाबतच्या कार्यपध्दतीचा अवलंब क्षेत्रिय कार्यालयाकडून होत नसल्याचे निदर्शनास आले असल्यामुळे तसेच अतिरिक्त ठरणारे शिक्षक समायोजित ठिकाणी हजर होत नाहीत. परिणामी अशा शिक्षकांना काम नसताना वेतन अदा करावे लागते व त्याचा शासनावर अतिरिक्त आर्थिक भार पडतो, त्याचवेळी काही ठिकाणी शिक्षकां अभावी विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होते.

३ काही जिल्हयामध्ये अतिरिक्त शिक्षकांचे समायोजन करण्यासाठी रिक्त पदे उपलब्ध नाहीत. त्यामुळे या जिल्हयांतील सर्व अतिरिक्त शिक्षकांचे समायोजन होणे शक्य नाही. अशा जिल्हयातील शिक्षकांचे समायोजन विभागांतर्गत अन्य जिल्हयात करावे लागते. यामुळे त्यांना कुटुंबापासून दीर्घकाळ दूर रहावे लागते. कुटुंबाशी निगडीत जबाबदा-या व इतर कर्तव्ये पार पाडणे त्यांना अवघड होते. त्याचा परिणाम विद्यार्थ्यांच्या शिक्षणावर व पर्यायाने शैक्षणिक गुणवत्तेवर होण्याची शक्यता असते. या बाबींचा विचार करुन शिक्षकांचे समायोजन त्याच जिल्हयात करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन निर्णय :-**

राज्यातील अनुदानित खाजगी प्राथमिक / उच्च प्राथमिक / माध्यमिक शाळेतील अतिरिक्त ठरणाऱ्या शिक्षकांचे समायोजन करताना खालील प्रमाणे कार्यपध्दतीचे अनुपालन करण्यात यावे.

**अ) जिल्हांतर्गत समायोजन :-**

१) अनुदानित खाजगी प्राथमिक / उच्च प्राथमिक / माध्यमिक शाळेतील अतिरिक्त ठरणाऱ्या शिक्षकांचे समायोजन प्रथम खाजगी प्राथमिक / उच्च प्राथमिक / माध्यमिक शाळांमध्ये करण्यात यावे.

२) स्थानिक स्वराज्य संस्था (जिल्हा परिषद, नगर पालिका, नगर परिषद, महानगरपालिका) मधील प्राथमिक / उच्च प्राथमिक / माध्यमिक शाळेतील अतिरिक्त ठरणाऱ्या शिक्षकांचे समायोजन प्रथम स्थानिक स्वराज्य संस्थांमधील शाळांतील रिक्त पदांवर करण्यात यावे.

३) अनुदानित खाजगी प्राथमिक / उच्च प्राथमिक / माध्यमिक शाळांमध्ये समायोजनाकरीता जागा रिक्त नसल्यास अनुदानित खाजगी शाळांमधील अतिरिक्त ठरलेल्या शिक्षकांचे समायोजन स्थानिक स्वराज्य संस्थांमधील शाळांतील रिक्त पदांवर (जिल्हा परिषद/नगर पालिका / नगर परिषद/महानगर पालिका या क्रमाने ) करण्यात यावे.

४) स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये समायोजनाकरीता जागा रिक्त नसल्यास स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये अतिरिक्त ठरलेल्या शिक्षकांचे समायोजन अनुदानित खाजगी प्राथमिक / उच्च प्राथमिक / माध्यमिक शाळांमध्ये करण्यात यावे.

**ब) विभागांतर्गत समायोजन :-**

जिल्हयांतर्गत समायोजन झाल्यानंतरही अतिरिक्त शिक्षकांचे पूर्णपणे समायोजन न झाल्यास अशा शिक्षकांचे मुद्दा क्र. “अ” मधील १ ते ४ टप्प्यांनुसार विभागांतर्गत समायोजन करण्यात यावे.

२. जिल्हा व विभाग स्तरावरील समायोजन करताना खालील कार्यपध्दतीचा अवलंब करण्यात यावा :-

(i) जिल्हा शैक्षणिक माहिती प्रणाली (DISE) च्या अनुषंगाने राज्यात शिक्षक-विद्यार्थी गुणोत्तर प्रमाण पुरेसे आहे. तथापि, संचमान्यता / पटपडताळणीमुळे विद्यार्थी संख्या कमी होणे किंवा वर्ग/ तुकड्या बंद पडणे शाळेची मान्यता काढून घेणे या कारणास्तव जे शिक्षक अतिरिक्त ठरत असतील, अशा शिक्षकांचे त्वरीत अन्य ठिकाणी समायोजन होणे अनिवार्य आहे.

(ii) महाराष्ट्र खाजगी शाळांतील कर्मचारी (सेवेच्या शर्ती) नियमावली १९८१ मधील नियम २६ अनुसार अनुदानित खाजगी प्राथमिक / उच्च प्राथमिक / माध्यमिक शाळेतील अतिरिक्त शिक्षकांचे प्रथमत: समायोजन करण्यात यावे.

(iii) ग्राम विकास व जलसंधारण विभागाच्या बदल्या / समायोजनाचे नियम लागू करु नये.

(iv) ऑनलाईन समायोजन करतांना सदर शिक्षकांचे सेवा ज्येष्ठतेनुसार उपलब्ध रिक्त जागांवर समायोजन करावे.

(v) समायोजन करतांना विषयाची आवश्यकता तपासावी तसेच समायोजनाचे इतर प्रचलित नियम लागू राहतील.

(vi) समायोजन झाल्यानंतर मूळ आस्थापनेवर पदनिर्मिती झाल्यास अशा शिक्षकांना परत मूळ आस्थापनेवर नियुक्ती देण्यात यावी. तथापि समायोजन झाल्याच्या दिनांकापासून ३ वर्षापर्यंत असे पद निर्माण न झाल्यास अशा शिक्षकांना ज्या आस्थापनेवर समायोजन झाले आहे त्या आस्थापनेच्या सेवा शर्ती लागू राहतील व याबाबत आवश्यकता भासल्यास स्वतंत्र धोरण शासन जाहिर करेल. (उदा. खाजगी शाळेमधून जिल्हा परिषदेमध्ये समायोजन झाले असल्यास ३ वर्ष पूर्ण झाल्यानंतर जिल्हा परिषदेच्या सेवा शती लागू राहतील तसेच जिल्हा परिषदेमधून खाजगी शाळांमध्ये समायोजन झाले असल्यास ३ वर्ष पूर्ण झाल्यानंतर महाराष्ट्र खाजगी शाळांतील कर्मचारी (सेवेच्या शर्ती) नियमावली, १९८१ मधील तरतुदी लागू राहतील.)

(vii) अतिरिक्त ठरलेल्या शिक्षकांचे समायोजन करताना त्यांच्या मूळ वेतनास संरक्षण राहील. मात्र अन्य भत्त्यांच्या बाबतीत त्या त्या क्षेत्राकरीता राज्य शासनाने लागू केलेले भत्ते त्यांना विहित नियमानुसार अनुज्ञेय राहतील.

(viii) समायोजन करताना बालकांचा मोफत व हक्काचा शिक्षणाचा अधिकार अधिनियम, २००९ मधील निकषांची पूर्तता होत असल्याची दक्षता घेण्यात यावी.

(ix) अतिरिक्त शिक्षकांचे समायोजन करताना संबंधित स्थानिक स्वराज्य संस्था अथवा त्यांच्या शिक्षण मंडळ / शिक्षण समिती यांनी ठराव मंजूर करण्याची आवश्यकता राहणार नाही.

(x) जिल्हयांतर्गत समायोजन संबंधित जिल्हयाचे शिक्षणाधिकारी यांचेमार्फत व जिल्हांतर्गत समायोजन करणे शक्य नसल्यास लगतच्या जिल्ह्यात विभागीय शिक्षण उपसंचालक यांचेमार्फत वरील पध्दतीनुसार समायोजन करण्यात यावे.

(xi) वरील कार्यपध्दतीनुसार अतिरिक्त शिक्षकांचे समायोजन झाल्यानंतर जे शिक्षक समायोजित ठिकाणी हजर होणार नाहीत अशा हजर न होणा-या शिक्षकांचे वेतन अदा करण्यात येऊ नये. त्यांचे विरुध्द नियमानुसार कारवाई करण्यात यावी. तसेच ज्या शाळांनी अशा समायोजनानुसार अतिरिक्त शिक्षकास हजर करुन घेण्यास नकार दिला किंवा टाळाटाळ केली असल्यास त्या शाळेचे सदर पद व्यपगत करावे व शालार्थ प्रणालीमधून असे पद काढून टाकावे.

(xii) वरील कार्यपध्दतीनुसार अतिरिक्त शिक्षकांचे समायोजन विभागीय शिक्षण उपसंचालक परिक्षेत्रामध्ये करण्यात यावे. याकरीता विभागीय शिक्षण उपसंचालक हे समन्वय अधिकारी असतील. याबाबत संबंधित विभागीय शिक्षण उपसंचालक यांनी वेळोवेळी आढावा घेवून खात्री करुन घ्यावी व तशा सूचना आपल्या अधिपत्याखालील सर्व संबंधितांना द्याव्यात.

(xiv) अतिरिक्त शिक्षकांचे समायोजन योग्य पध्दतीने व विहित कालमर्यादेत करण्याची जबाबदारी संबंधित शिक्षणाधिकारी / विभागीय शिक्षण उपसंचालक यांची राहील.

(xv) अतिरिक्त शिक्षकांच्या समायोजनाचा मासिक आढावा वेळोवेळी शिक्षण संचालक (प्राथमिक) /शिक्षण संचालक (माध्यमिक व उच्च माध्यमिक) महाराष्ट्र राज्य, पुणे यांनी घ्यावा व तशा सूचना सर्व संबंधितांना द्याव्यात व अहवाल आयुक्त (शिक्षण), महाराष्ट्र राज्य, पुणे यांचेमार्फत दरमहा शासनास सादर करण्यात यावा.

३. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१७१००४१३१५३७२९२१ असा आहे. हा शासन निर्णय डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने.

Charushila D Chaudhari

Digitally signed by Charushila D Chaudhari
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=School Education And Sports Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=b99d7dca0e63be1bd1b7158b9523537dcc1d46bc807768647a9ed4ff3816ecf3, cn=Charushila D Chaudhari
Date: 2017.10.04 13:05:32 +05'30'

**( चारुशीला चौधरी )**
**उप सचिव, महाराष्ट्र शासन**

**प्रति,**

१) मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन,मंत्रालय,मुंबई,

२) मा.मुख्यमंत्री यांचे अपर मुख्य सचिव, मुख्यमंत्री यांचे कार्यालय,मंत्रालय,मुंबई,

३) प्रधान सचिव, ग्राम विकास विभाग,मंत्रालय,मुंबई,

४) प्रधान सचिव, नगर विकास विभाग,मंत्रालय,मुंबई,
५) प्रधान सचिव, सामाजिक न्याय व विशेष सहाय विभाग, मंत्रालय,मुंबई,
६) प्रधान सचिव, आदिवासी विकास विभाग, मंत्रालय,मुंबई,
७) सर्व विधानसभा/विधानपरिषद सदस्य,
८) शिक्षण आयुक्त, महाराष्ट्र राज्य,पुणे-१,
९) शिक्षण संचालक, (प्राथमिक) महाराष्ट्र राज्य,पुणे-१,
१०) शिक्षण संचालक ( माध्यमिक व उच्च माध्यमिक), महाराष्ट्र राज्य,पुणे,
११) सर्व मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद,
१२) सर्व विभागीय शिक्षण उपसंचालक,
१३) सर्व शिक्षणाधिकारी ( प्राथमिक/माध्यमिक), जिल्हा परिषद,
१४) विशेष कार्य अधिकारी, मा.मंत्री, शालेय शिक्षण,मंत्रालय,मुंबई,
१५) सर्व कार्यासने, शालेय शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई,
१६) निवडनस्ती, (टीएनटी-२).